**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५४ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८१** **दिनांक —२४ /०७/२०२५**

**विभाग — सार्व.बांध.विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय —** अहिल्यानगर मनपाचे केडगाव अमरधाम येथील अंत्यविधी दहन ओटयाजवळील शेडचे काम कै. गणपतराव यादव धाडगे यांच्या स्मरणार्थ स्व-खर्चाने करणेसाठी परवानगी मिळणेबाबत

--**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार श्री. नंदकिशोर गणपत धाडगे, रा. केडगाव, ता. जि. अहिल्यानगर यांच्या दि. १२/०६/२०२५ पत्रानवये दि.१२/०६/२०२५ रोजी रात्रीच्या वेळेस वादळी वा-यामुळे केडगाव अमरधाम मध्ये झाडे पडून अंत्यविधी दहन ओटयावर असलेले लोखंडी शेड व त्यावरील पत्रे पुर्णपणे तुटलेले असून नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यांचे वडील कै. गणपतराव यादव धाडगे यांच्या स्मरणार्थ शेडचे नुतणीकरण स्व-खर्चाने करण्यास तयार असलेबाबत व लवकरात लवकर परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री. नंदकिशोर गणपत धाडगे, रा. केडगाव, ता.जि.अहिल्यानगर यांचे मागणीनूसार पत्रा सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे स्व-खर्चाने शेडचे काम करण्यास परवानगी देणेस हरकत नाही.
तरी महानगरपालिकेच्या प्रस्तावात नमुद अटी व शर्तीस अधिन राहून अहिल्यानगर मनपाचे केडगाव अमरधाम येथील अंत्यविधी दहन ओटयाजवळील शेडचे काम
श्री. नंदकिशोर गणपत धाडगे, रा. केडगाव, ता.जि.अहिल्यानगर यांना स्व खर्चाने करण्यास
मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिक |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५४ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८२** **दिनांक — २४/०७/२०२५**

**विभाग — सार्व. बाधं वि.**

---

**प्रस्तावाचा विषय** — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा येथील चौकास महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असे नामकरण करणेबाबत

--**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार मार्केटयार्ड येथिल परिसरास महामानव '' **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर** '' यांच्या पुर्णाकृती पुतळा उभारण्यांत येणार आहे. त्याचे औचित्य साधुन सदर चौकास महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैाक असे नामकरण करणेबाबत विधानसभा सदस्य-महाराष्ट्र राज्य, मा. आमदार संग्राम अरूणकाका जगताप व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा समिती अहिल्यानगर शहर यांनी मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खालील प्रमाणे आहे.

१) अनुसूची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि ( जागांना ) क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल, ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

२) प्रक्ररण-२९ नियम, उपविधी विनियम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ.क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि ( जागांचा क्रमांक देणे ) याबाबींसाठी नियम करता येईल

३) सदर चौकामध्ये येणारे रस्ते पैकी मार्केटयार्ड मधुन येणारा व शहरातुन येणारा रस्ता महानगरपालिकेचा आहे व नगर पुणे रस्ता सार्वजनिक विभागाचा आहे.

यास्तव अहिल्यानगर महानगरपलिका हद्दीतील मार्केटयार्ड येथिल परिसरातील चौकास महामानव ‘‘ **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर** ’’ चौक असे नामकरण करण्यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५४ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८3** **दिनांक — २४/०७/२०२५**

**विभाग — सार्व.बाधं विभाग.**

---------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय** — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उदघाटन कार्यक्रमाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत

--**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार जा.क्र. साप्रवि २२२ दि.२१/०७/२०२५ अन्वये मिळालेल्या आदेशानुसार व मा. आयुक्त यांनी दिनांक १९/०७/२०२५ रोजी मा.आमदार महोदयांसमवेत केलेल्या समक्ष पाहणीनुसार दिलेले निर्देशानुसार महात्मा ज्योतीबा फुले व सातित्रीबाई फुले पुतळा समितीने देखील केलेल्या मागणीनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण व महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळयाच्या परिसराचे सुशोभीकरणाच्या शुभारंभ असे दोन्ही कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे मा.उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार साहेब यांच्या हस्ते होणार असल्याने सदर ठिकाणी खालील प्रमाणे कामाचे नियोजन करण्यात आले आहे.

मा.उपमुख्यमंत्री महोदय प्रथमत: महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळयाच्या परिसराचे सुशोभिकरण करणेचा कार्यक्रम होणार असून सदर ठिकाणच्या परिसरात स्टेज लावणे मंडप लावणे व सायंकाळची वेळ असल्याने विद्युत व्यवस्था करणे तसेच मा. उपमुख्यमंत्री महोदय हे माळीवाडा विशाल गणपती मंदिरामध्ये दर्शनासाठी जाणार असल्याने बॅरीकेटींग करणे व हार फुले यांची व्यवस्था करणे तसेच त्या ठिकाणी उद्घाटन होणार असल्याने सत्कारासाठी हार इत्यादी व्यवस्था करणे तद्नंतर मा.उपमुख्यमंत्री महोदय व इतर मान्यवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरण ठिकाणी जाऊन पुतळयाचे अनावरण करून त्याचबरोबर सदर चौकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक असे नामकरण सोहळा देखील होणारा असून तदनंतर उद्घाटन सोहळा पांजरपोळ या संस्थेच्या जागेत मोठया स्वरूपात होणार आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामळे सदर कार्यक्रमाच्या वेळी दोन्ही ठिकाणी मंडपात बसणा-या लोकांना पाऊस लागू नये यासाठी जर्मन हँगर टाईप मंडप व्यवस्था करणे तसेच बसण्यासाठी सुमारे ४ ते ५ हजार खुर्च्यांची व्यवस्था करणे व स्टेज असे नियोजन करण्यात आलेले असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक श्री. आनंद

शिंदे यांचा गायनाचा कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित केला आहे. त्या ठिकाणी मनपाचे देखील विकास कामांचे सादरीकरण मा. उपमुख्यंमंत्री यांना होणार असल्याने सदर कार्यक्रमाला मोठे स्वरूप आहे त्यामुळे सदर कार्यक्रम होईपर्यंत या दोन्ही कार्यक्रमाकरीता अंदाजे रूपये १५ लक्ष ते २० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. विषयांकित आदेशानुसार मनपाच्या प्रत्येक विभागाला दिलेल्या कामकाज वाटपानुसार कामाचा अहवाल प्रत्यक्ष प्राप्त होणार आहे तोपर्यंत संबंधित नोडल अधिकारी हे मा.आयुक्त यांचे अधिपत्याखाली दोन्ही कार्यक्रम नियोजनबद्ध पार पाडण्याचे दृष्टीने मनपाचे विविध विभागांशी समन्वय साधुन कामे करून घेणार आहे.

विभागाने सादर केलेल्या नियोजीत खर्चसाठीच्या प्रस्तावास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका